**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : ०४/१२/२०१४

**मा.सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत**
**सभा क्रमांक २२, दिनांक ०४/१२/२०१४**
**सभा सूचना क्रमांक ०७, दिनांक ११/११/२०१४**
**सभा क्रमांक ०४, दिनांक ०४/१२/२०१४**

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २०/११/२०१४ रोजी सकाळी ठिक ११.३० वा. ठाणे महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सभा सूचना क्रमांक ०७, दि.११/११/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. परंतु सदरहू दिवशी सभा तहकूब झाल्याने त्याच दिवशी त्याच ठिकाणी सभा आयोजित करण्यात आली होती. दि.२०/११/२०१४ रोजी सभा पुन्हा खंडीत झाल्याने सदरची सभा शुक्रवार दि.२८/११/२०१४ रोजी बोलाविण्यात आली होती.

परंतु सदर सभा सदर दिवशी तहकूब झाल्याने सदरची सभा गुरुवार दि.०४/१२/२०१४ रोजी सभा सूचना क्रमांक ०७, दि.२०/११/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलाविण्यात आली होती.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.महापौर श्री.संजय भाऊराव मोरे हे उपस्थित होते.

**सदर सभेस खालील प्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.**

१.सन्मा.श्री.संजय भाऊराव मोरे - महापौर
२. सन्मा.श्री.राजेंद्र रमेश साप्ते-उमहपौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | सन्मा.आरज प्रगती भारत | ४. | श्री.नरेश रतन मणेरा |
| ५. | श्री.मनोहर जयसिंग डुंबरे | ६. | श्री.मुकेश मधुकर मोकाशी |
| ७. | सौ.उज्ज्वला रामचंद्र फडतरे | ८. | सौ.मिनाक्षी राजेंद्र शिंदे |
| ९. | श्री.जयनाथ यशवंत पुर्णेकर | १०. | सौ.स्नेहा अंकुश पाटील |
| ११. | श्री.मधुकर रामचंद्र पावशे | १२. | सौ.उषा संजय भोईर |
| १३. | श्री.संजय देवराम भोईर | १४. | सौ.आशादेवी शेखबहादूर सिंग |
| १५. | श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील | १६. | सौ.चव्हाण तेजस्विनी किरण |
| १७. | श्री.सुधाकर वामन चव्हाण | १८. | श्रीमती इंदिसे रेखाबाई मिनानाथ |
| १९. | श्री.संभाजी धोंडीराम पंडित | २०. | सौ.प्राजक्ता प्रदिप खाडे |
| २१. | श्री.विलास चंदू कांबळे | २२. | श्रीमती सुशिला संकटाप्रसाद यादव |
| २३. | श्री.सरैया अमित जयसिंग | २४. | श्रीमती राधा फत्तेबहादूर सिंग |
| २५. | सौ.जाधवर राधाबाई सुभाष | २६. | श्री.हणमंत ज्ञानू जगदाळे |
| २७. | श्रीमती वर्षा वसंत पाटील | २८. | श्री.दशरथ बाबुराव पालांडे |
| २९. | सौ.विमल अर्जुन भोईर | ३०. | श्री.चव्हाण विक्रांत भिमसेन |
| ३१. | सौ.कल्पना हरिश्चंद्र पाटील | ३२. | सौ.शारदा विजय पाटील |
| ३३. | श्री.उमेश काशिनाथ पाटील | ३४. | सौ.रत्नप्रभा लक्ष्मण पाटील |
| ३५. | श्री.सुहास सुर्यकांत देसाई | ३६. | सौ.महेश्वरी संजय तरे |
| ३७. | श्री.रामचंद्र हरि एगडे | ३८. | सौ.नंदिनी राजन विचारे |
| ३९. | श्री.मंदार प्रमोद विचारे | ४०. | श्री.संतोष वसंत वडवले |
| ४१. | सौ.निर्मला शरद कणसे | ४२. | श्री.अशोक बारकू वैती |
| ४३. | सौ.प्रभा अशोक बोरीटकर | ४४. | श्री.रामभाऊ महादेव तायडे |

सचिव
ठाणे महानगरपालिका ठाणे

४५. सौ.आशा बाबासाहेब कांबळे
४६. डॉ.जितेंद्र प्रभाकर वाघ
४७. सौ.शान मनप्रित गुरमकसिंग
४८. श्री.मनोज तुकाराम शिंदे
४९. सौ.संगिता माणिक पाटील
५०. श्री.काशिराम (बाळा) गोविंद राऊत
५१. श्री.संजय पांडुरंग घाडीगांवकर
५२. सौ.विशाखा मधुकर खताळ
५३. श्री.योगेश तातोबा जानकर
५४. सौ.जगताप अश्विनी अशोक
५५. नम्रता दिपक भोसले
५६. श्री.नरेश गणपत म्हस्के
५७. श्री.हिराकांत बेंडू फर्डे
५८. सौ.सुजाता भास्कर पाटील
५९. सौ.रुचिता राजेश मोरे
६०. श्री.नारायण शंकर पवार
६१. सौ.सारिका संजय सोनार
६२. श्री.सुधीर विष्णू कोकाटे
६३. श्री.महेश सुरेश वाघ
६४. सौ.पुजा गणेश वाघ
६५. श्री.नजिब सुलेमान मुल्ला
६६. श्रीमती वहिदा मुस्तफा खान
६७. सौ.साळवी अपर्णा मिलिंद
६८. सौ.मनाली मिलिंद पाटील
६९. श्री.मिलिंद भारत पाटील
७०. सौ.केणी प्रमिला मुकुंद
७१. श्री.केणी मुकुंद बाळू
७२. सौ.मेघना सुनिल हंडोरे
७३. श्री.महाद्वीप भुपेंद्रसिंग बिष्ट
७४. श्री.सामंत विलास शिवराम
७५. श्री.संजय संतु वाघुले
७६. सौ.पाटील मालती रमाकांत
७७. श्री.टिकमानी लक्ष्मण (लच्छू)
७८. सौ.नाईक राजश्री सुनिल
७९. श्री.राजे गिरीश अनंत
८०. सौ.पाटील अवंतिका शशिकांत
८१. श्री.ठाकूर अक्षय अनंत
८२. सौ.कळंबे मंगल चंद्रकांत
८३. श्री.बालाजी दगडू काकडे
८४. कुरेशी साजिया आई
८५. कुरेशी यासिन अयुब
८६. आशिया यासिन कुरेशी
८७. श्री.विश्वनाथ भगत
८८. सौ.गोटे सिंधु कुंदन
८९. सौ.रेश्मा रमेश पाटील
९०. मिर्झा जमेला तबस्सूम इनायत बेग
९१. पठाण अश्ररफ उस्मान
९२. अफिजा नसरुद्दीन नाईक
९३. आशरिन इब्राहिम राऊत
९४. खान मिराज नईम
९५. श्री.हिरा सिताराम पाटील
९६. श्री.पाटील शैलेश मनोहर
९७. सौ.मुंडे सुनिता गणेश

**<u>सदर सभेस खालील प्रमाणे सन्मा.सदस्य अनुपस्थित होते.</u>**

१. सौ.बिंदू महेंद्र मढवी
२. श्री.वाव्हळ सुभाष सिताराम
३. श्री.राजकुमार रामनयन यादव
४. सौ.सरनाईक परिषा प्रताप
५. श्री.सरनाईक विहंग प्रताप
६. श्री.पांडे संजय श्रीनाथ
७. श्री.डिसोजा लॉरेन्स साल्वाडोर
८. सौ.विजया मनोज लासे
९. ॲड.गौरी अनिता सुनिल
१०. श्री.मिलिंद माधव पाटणकर
११. सौ.नंदा कृष्णा पाटील
१२. सौ.भोईर एकता एकनाथ
१३. सौ.मोरे संध्या सुनिल
१४. श्री.वेतकर दिपक विजय
१५. सौ.संख्ये मिनल मुकुंद
१६. श्री.साळवी मनोहर रामा
१७. श्री.महेश जगन्नाथ साळवी
१८. सौ.मनिषा महेश साळवी
१९. सौ.लोखंडे सुहासिनी सुनिल
२०. श्रीमती अनिता अरुण बिर्जे
२१. श्री.भरत अभिमन्यु चव्हाण
२२. श्रीमती रेखा भालचंद्र पाटील
२३. श्री.राजेश भालचंद्र गवारी
२४. सौ.यादव रिटा राजनाथ
२५. श्री.भगत सुधीर रामचंद्र
२६. श्री.किणे राजन नारायण
२७. डोंगरे सिराज महम्मद अली
२८. अन्सारी साजिया परवीन सरफराज

( छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास मा.महापौर सौ. पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करतात.)

सचिव
ठाणे महानगरपालिका ठाणे

**मा.महापालिका सचिव :-**

सभेचे परिपत्रक वाचून दाखवितात व सभेस सुरुवात करतात.

**श्री.मनोज शिंदे :-**

महापौर महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, तत्कालिन ........

**श्री.हरिश्चंद्र पाटील :-**

महापौर महोदय, हरकतीचा मुद्दा कोणत्या विषयावर आहे.

**श्री.मनोज शिंदे :-**

महापौर महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले यांच्या निधनामुळे सरकारने तीन दिवसांचा दुखवटा जाहिर केल्यानंतर आजची ही सभा लावणे योग्य आणि कायदेशीर आहे का ?

**मा.महापालिका सचिव :-**

महापौर महोदय, आजची ही जी सभा आयोजित झालेली आहे, ती पूर्व नियोजित आहे. शासनाकडून महापालिकेस एक वायरलेस मॅसेस प्राप्त झाला आहे. मा.महापौर महोदयांची परवानगी असेल तर मी या ठिकाणी वाचून दाखवितो.

( शासनाकडून प्राप्त मॅसेस वाचून दाखवितात.)

THE GOVERNMENT OF MAHARASHTRA ANNOUNCES WITH MOST PROFOUND REGRET THE DEATH OF SHRI A. R. ANTULAY, FORMER UNION CABINET MINISTER AND FORMER CHIEF MINISTER OF MAHARASHTRA AT MUMBAI ON THE $02^{ND}$ DECENBAR 2014(.) THE FUNERAL WILL TAKE PLACE ON $03^{RD}$ DECENBAR 2014 AT AROUND 1300 HRS AT AMBET, TALUKA MHASALA, RAIGAD(.)

AS A MARK OF RESPECT TO THE DEPARTED LEADER THE STATE GOVERNMENT HAS DECLARED THREE DAYS STATE MOURNING ON THE $02^{ND}$ DECEMBER, $03^{RD}$ DECEMBER AND $04^{TH}$ DECEMBER 2014 (.) DURING THIS PERIOD THE NATIONAL FLAG WILL BE FLOWN AT HALF MAST THROUGHOUT THE STATE OF MAHARASHTRA ON ALL GOVERNMENT BUILDINGS WHERE IT IS FLOWN REGULARLY,

THERE WILL BE NO OFFICIAL ENTERTAINMENT DURING THE PERIOD OF STATE MOURNING (.)

**श्री.हणमंत जगदाळे :-**

महापौर महोदय, याचा मराठीत अर्थ काय होतो ?

**मा.महापालिका सचिव :-**

महापौर महोदय, शेवटची जी लाईन आहे THERE WILL BE NO OFFICIAL ENTERTAINMENT DURING THE PERIOD OF STATE MOURNING (.) याचा अर्थ असा आहे की, कोणतीही महापालिका पुरस्कृत रंगारंग कार्यक्रम Entertainment.

**श्री.हणमंत जगदाळे :-**

महापौर महोदय, अशा प्रकारची ज्यावेळी घटना घडते, त्यावेळी आपण काय करायला पाहिजे.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

**श्री.संजय घाडीगांवकर :-**

महापौर महोदय, सन्मा.विरोधी पक्षनेते यांचे उत्तर देतांना माझेही उत्तर देण्यात यावे. जे शेवटचे वाक्य सचिव यांनी वाचले ते पुन्हा एकदा वाचावे.

**महापालिका सचिव :-**

महापौर महोदय, OFFICIAL ENTERTAINMENT.

**श्री.संजय घाडीगांवकर :-**

महापौर महोदय, याचा नक्की अर्थ काय ?

**मा.महापालिका सचिव :-**

Entertainment असा शब्द आहे. कुठलाही महापालिका पुरस्कृत मनोरंजनाचा कार्यक्रम करु नये.

**श्री.मनोज शिंदे :-**

महापौर महोदय, सदरचा मॅसेज हा दुखवटया संदर्भात दिलेला आदेश आहे. आपण आज ही सभा आयोजित केली आहे, त्याबाबत काय कायदा, नियम आहेत ते वाचून दाखवा.

**श्री.नजिब मुल्ला :-**

महापौर महोदय, दुखवटया संदर्भात आपली प्रथा काय ?

**मा.महापौर सो. :-**

सन्मा.सभागृह सदरची सभा ही पूर्व नियोजित होती, आणि त्यानंतर जी दुःखद घटना घडली, त्यासंदर्भात ३ दिवसाचा शासकीय दुखवटा आहे. याबाबत सन्मा.विरोधी पक्षनेते यांनी सभा तहकूबी मांडली आहे. आणि सन्मा.सभागृह नेते यांनी दुखवटा सादर केला होता. आणि यासाठी आजची ही सभा श्रध्दांजली वाहण्यासाठी म्हणून आयोजित केली आहे, आणि या अनुषंगाने सदर सभा पूर्ण दिवसासाठी तहकूब करण्यात येत आहे. कृपया आपण सर्वांनी श्रध्दांजली वाहावी.

**श्री.संजय घाडीगांवकर :-**

महापौर महोदय, शासकीय दुखवटा असतांना आपण ही सभा कशी काय घेवू शकतो. हा कामकाजाचा भाग नाही का ?

**श्री.हणमंत जगदाळे :-**

महापौर महोदय, आपण अशी प्रथा पाडू नका, हे पत्र आपल्याला कधी आले.

**श्री.संजय घाडीगांवकर :-**

महापौर महोदय, वास्तविक पाहतां, सदरची सभा परिपत्रक काढून रद्द केली पाहिजे होती.

**मा.महापौर सो. :-**

आपण या ठिकाणी श्रध्दांजली वाहून सभा तहकूब करणार आहोत ना, आपल्याला काय अपेक्षित आहे ते सांगा.

**श्री.संजय घाडीगांवकर :-**

महापौर महोदय, शासकीय दुखवटा आहे मग आपण श्रध्दांजली अर्पण करु शकतो. माझ्या पत्राचे उत्तर मला द्यावे. आपण आज श्रध्दांजली घेवू शकत नाही, हया सभेचे काम बेकायदेशीर होवू शकते. आपण उद्या श्रध्दांजली वाहू शकतो.

-महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

**श्री.नारायण पवार :-**

महापौर महोदय, ३ दिवसाचा शासकीय दुखवटा आहे मग आपण सभा कशी घेवू शकतो.

**श्री.संजय घाडीगांवकर :-**

महापौर महोदय, सचिवांनी याचा खुलासा करावा.

**श्री.नजिब मुल्ला :-**

महापौर महोदय, सन्मा.विरोधी पक्षनेते, श्री.नारायण पवार, श्री.संजय घाडीगांवकर यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. याचा प्रशासनातर्फे खुलासा करण्यात यावा. वास्तविक पाहतां, परिपत्रक काढून ही सभा पुढे ढकलली पाहिजे होती.

**मा.महापौर सो. :-**

आपण श्रध्दांजली अर्पण करु शकतो.

**श्री.संजय घाडीगांवकर :-**

महापौर महोदय, सचिवांनी सभेचे कामकाज करण्यापूर्वी मी दिलेल्या पत्राचे उत्तर मला द्यावे. मा.आयुक्त सो. यांनी सांगावे, मा.आयुक्त सो. यांना माझे पत्र दाखवा. चुकीचे कृत्य होत आहे.

**मा.महापौर सो. :-**

मी विनंती करतो की, आपण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.

**श्री.संजय घाडीगांवकर :-**

महापौर महोदय, मा.आयुक्त साहेब आपण अनुभवी आहात, आपण सांगावे की, शासकीय दुखवटयामध्ये आपण सभा घेवू शकतो का ? ही सभा पुढे ढकलली पाहिजे होती, अजाणतेपणे आपण परिपत्रक काढलेले नाही. मा.आयुक्त सो. यांनी हया सभेचे कामकाज होवू शकते का याचा खुलास करावा.

**श्री.सुहास देसाई :-**

महापौर महोदय, ही प्रशासकीय बाब आहे, मा.आयुक्त सो. यांनी खुलासा करावा.

( सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)

**श्री.संजय घाडीगांवकर :-**

महापौर महोदय, मी लेखी पत्र दिले आहे, या सभेचे कामकाज होवू शकते का याचा सचिवांनी खुलासा करावा. महापौर महोदय, प्रशासनाला माझी विनंती आहे की, शासनाने दुखवटा सादर केला आहे, मग आपण ही सभा घेवू शकतो का याचा खुलासा करण्यात यावा.

महापौर महोदय, मी लेखी पत्र दिलेले आहे, त्याचा लेखी खुलासा देण्यात यावा.

**मा.महापालिका सचिव :-**

महापौर महोदय, या ठिकाणी आपल्याला जो वायरलेस मॅसेज प्राप्त झाला आहे, त्याच्यामध्ये स्पष्ट दिले आहे की, महापालिका पुरस्कृत कुठलाही मनोरंजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येवू नये.

**श्री.संजय घाडीगांवकर :-**

महापौर महोदय, सचिवांचे म्हणणे आहे की, हे कायदेशीर कामकाज आहे, मी तुम्हाला पत्र दिलेले आहे, सभेचे कामकाज सुरु करण्यापूर्वी मी जे पत्र दिलेले आहे, मा.महापौर, मा.आयुक्त यांना सुध्दा पत्र दिलेले आहे, मा.आयुक्त सो. यांना माझे पत्र वाचावयास द्यावे, आणि त्याबाबतचा खुलासा द्यावा आणि त्यानंतर कामकाज सुरु करण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

## दुखवटा ठराव

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक** **दिनांक ०४.१२.२०१४**

**ठ रा व :-**

माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए.आर.अंतुले यांचे मंगळवार दि.०२/१२/२०१४ रोजी प्रदीर्घ आजाराने वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. गेल्या महिन्याभरापासून किडनीच्या विकाराने त्रस्त असलेल्या बॅ.ए.आर.अंतुले यांच्यावर उपचार सुरु होते. मात्र ते उपचारांना प्रतिसाद देत नसल्याने त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत गेली.

बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले यांचा जन्म ९ फेब्रुवारी १९२९ रोजी रायगड जिल्हयातील आंबेत या गावी झ ाला. मुंबई विद्यापीठातून पदवी शिक्षण पूर्ण केल्यानंतर लंडन येथे वकिलीचे शिक्षण घेऊन त्यांनी बॅरिस्टर ही पदवी मिळवली. त्यानंतर ही पदवीच त्यांची ओळख बनली.

बॅ.अंतुले यांची चुणूक बघून यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्यावर युवकांना काँग्रेसच्या झेंडयाखाली संघटित करण्याची जबाबदारी सोपविली होती. सन १९६२ साली बॅरिस्टर ए.आर.अंतुले हे पहिल्यांदा महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेले. तेव्हापासून ते सन १९७६ पर्यंत ते विधानसभेवर होते. त्या दरम्यानच्या काळात त्यांनी राज्याच्या मंत्रिमंडळात अनेक खात्यांचे उत्कृष्ट असे मंत्रीपद भूषविले. सन १९७६ ते सन १९८० या काळात ते राज्यसभेवर होते.

९ जून १९८० ते १२ जानेवारी १९८२ या कालखंडात महाराष्ट्राचे पहिले मुस्लिम मुख्यमंत्री व कोकणातील पहिले मुख्यमंत्री असलेल्या बॅ.अंतुले यांनी आपल्या आक्रमक स्वभावाने मुख्यमंत्री पदी येताच धडाक्याने निर्णय घ्यायला सुरुवात केली. सिंधुदुर्ग, जालना, लातूर, गडचिरोली या नव्या जिल्हयांची निर्मिती, संजय गांधी निराधार योजनेची मुहूर्तमेढ, गटांचं तालुक्यात रुपांतर असे अनेक निर्णय बॅ.अंतुले यांनी घेतले. कोकणचा कॅलिफोर्निया करण्याची घोषणा बॅ.अंतुले यांनीच सर्वप्रथम दिली होती. लोकहिताचे निर्णय राबविताना गतीमान प्रशासन कसे असावे हे त्यांनी मुख्यमंत्री पदावर असताना दाखवून दिले होते. मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात त्यांनी लोकहिताच्या अनेक योजना राबविल्या. दुर्बल, गरीब घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. बॅ.अंतुले यांच्या निधनाने महाराष्ट्र दूरदृष्टी असलेल्या कुशल प्रशासकास मुकला आहे. तात्काळ निर्णयक्षमता, काम उरकण्याचा विलक्षण झपाटा व समाजातील सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याची तळमळ असा त्यांचा नावलौकिक होता. बॅ.अंतुले यांनी उपेक्षित समाजघटक व गरीबांसाठी अनेक चांगले निर्णय घेतले. दलित समाज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांबद्दल त्यांना आस्था होती. गरीबीचे चटके सहन करुन वर आलेल्या बॅ.अंतुले यांच्या निर्णयप्रक्रियेचा गरीब माणूस हा नेहमी केंद्रबिंदू होता.

बॅ.ए.आर.अंतुले यांनी निधनामुळे महाराष्ट्राने एक अभ्यासू आणि प्रचंड निर्णय क्षमता असलेला धडाकेबाज नेता गमावल्याची भावना सर्व स्तरातून होत आहे.

माजी मुख्यमंत्री कै.बॅ.ए.आर.अंतुले यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हे दुःख त्यांच्या कुटुंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर त्यांना देवो व कै.बॅ.ए.आर.अंतुले यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सुचक :- श्री.नरेश म्हस्के | अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सही/-
(संजय भाऊराव मोरे )
महापौर,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**( मनिष जोशी )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

सभा तहकूब झाल्याची वेळ : दुपारी ठिक १.३२ वा.
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे
दिनांक : ०४/१२/२०१४

दि १३-१-१५ रोजीच्या मा० सर्वसाधारण सभेत सदरचे इतिवृत्तां वाचून कायम करणेत आले.

ठाणे महानगरपालिका ठाणे